गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल
पुरविण्याच्या योजनेबाबत

**महाराष्ट्र शासन**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक : गटई -२०१०/प्र.क्र.२१९/मावक-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २ डिसेंबर, २०१०.

**वाचा:-** शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
क्रमांक:गटई-२००६/प्र.क्र.२०९/मावक-२, दि.१३.२.२००८

**शासन निर्णय** - राज्यामध्ये चामडयाच्या वस्तु व पादत्राणे याबाबतच्या व्यवसायात अनुसूचित जातीच्या व्यक्ती मोठया प्रमाणावर असून या व्यवसायामार्फत स्वत:च्या उपजिविका पूर्ण करतात सदर व्यावसायिक हे वर्षभर रस्त्याच्या कडेला उन्हात, पावसात बसून व्यवसाय करुन सेवा देत असतात या गटई कामगारांना ऊन, वारा, पाऊस या पासून संरक्षण मिळावे व त्यांची आर्थिक उन्नती व्हावी यासाठी १०० टक्के अनुदानावर पत्र्याचे स्टॉल पुरविण्याची योजना शासनाच्या संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फत राबविण्यात येते. सदर योजनेच्या अटी व शर्ती वरील दिनांक १३/०२/२००८ च्या आदेशातील परिशिष्ट " अ,ब, व क " मध्ये दिल्या आहेत. परिशिष्ट " क " नुसार निविदा प्रक्रिया बाबत जी कार्यपध्दती दिली आहे, त्यानुसार महामंडळाव्दारे कार्यवाही करण्यात येते. या आदेशान्वये सदर निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| (१) संचालक, समाजकल्याण संचालनालय, म.रा. पुणे- | **अध्यक्ष** |
| (२) संबंधित उप सचिव | **सदस्य** |
| (३) सह / उपसंचालक, उद्योग संचालनालय, मुंबई | **सदस्य** |
| (४) मुख्य लेखा अधिकारी, समाज कल्याण संचालनालय, म.रा. पुणे | **सदस्य** |
| (५) व्यवस्थापकीय संचालक, संत रोहिदास चर्मोद्योग महामंडळ, मुंबई | **सदस्य सचिव** |

सदर समितीने विहीत कार्यपध्दती अनुसरुन निविदा प्रक्रिया पूर्ण करावी. इतर अटी व शर्ती यामध्ये कोणतेही बदल नाही.

---------

२. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक क्रमांक २०१०१२०२२१५३१८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(उ. शि. लोणारे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा.मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री,सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव
मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांचे उप सचिव
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आयोग, मुंबई
अध्यक्ष, सफाई कर्मचारी आयोग, महाराष्ट्र, मुंबई
प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
व्यवस्थापकीय संचालक, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, मुंबई
संचालक, नगरपालिका प्रशासन वरळी, मुंबई
संचालक (प्रसिध्दी), माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीकरिता)
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, गट - अ, जिल्हा परिषद
महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षक, मुंबई
सर्व जिल्हा कोषाकार अधिकारी
सर्व महानगरपालिका / नगरपालिका / जिल्हा परिषद / कॅन्टोन्मेंट बोर्ड
सामाजिक न्याय विभागातील सर्व उपसचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी
संगणक कक्ष, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई ( शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरिता)
निवड नस्ती, मावक - २

---------